भारत सरकार

**विधि व न्याय मंत्रालय**

# केंद्रीय शिक्षण संस्था (प्रवेशाबाबत आरक्षण) अधिनियम, २००६

**(सन २००७ चा अधिनियम क्रमांक ५)**

[ रोजी यथाविद्यमान]

# The Central Educational Institutions (Reservation in Admission) Act, 2006

**(Act No. 5 of 2007)**

[*As in force on the* ]

*

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
२०१५

[ किंमत : रुपये .०० ]

एच ४०१०—१अ

# केंद्रीय शिक्षण संस्था (प्रवेशाबाबत आरक्षण) अधिनियम, २००६

## कलमांचा क्रम

**कलमे**

१. संक्षिप्त नाव.

२. व्याख्या.

३. केंद्रीय शिक्षण संस्थेतील जागांचे आरक्षण.

४. अधिनियम विवक्षित प्रकरणात लागू नसणे.

५. जागा वाढविणे अनिवार्य असणे.

६. २००७ या कॅलेंडर वर्षामध्ये प्रवेशांबाबत आरक्षण सुरू होणे.

७. संसदेसमोर अधिसूचना मांडणे.

**अनुसूची**

# केंद्रीय शिक्षण संस्था (प्रवेशाबाबत आरक्षण) अधिनियम, २००६

**(सन २००७ चा अधिनियम क्रमांक ५)**

**( रोजी यथाविद्यामान)**

**[३ जानेवारी २००७]**

केंद्र सरकारकडून स्थापन करण्यात आलेल्या, चालवण्यात येणाऱ्या किंवा अनुदान प्राप्त करणाऱ्या विवक्षित केंद्रीय शिक्षण संस्थांमध्ये, अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती व नागरिकांचे इतर मागासवर्ग यांतील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत आरक्षणासाठी व त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या सत्तावन्नाव्या वर्षी संसदेकडून तो पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

१. या अधिनियमास, केंद्रीय शिक्षण संस्था (प्रवेशाबाबत आरक्षण) अधिनियम, २००६, असे म्हणावे ; **संक्षिप्त नाव.**

२. या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,— **व्याख्या.**

(क) " शैक्षणिक सत्र " याचा अर्थ, कॅलेंडर वर्ष किंवा त्याचा भाग ज्यामध्ये केंद्रीय शिक्षण संस्था, कोणत्याही अध्ययनशाखेच्या किंवा विद्याशाखेच्या अध्यापनासाठी किंवा शिक्षणासाठी खुली असेल, असा कालावधी, असा आहे ;

(ख) " वार्षिक अनुज्ञेय विद्यार्थी संख्या " याचा अर्थ, केंद्रीय शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी समुचित प्राधिकरणाने प्राधिकृत केलेली, प्रत्येक अध्ययनशाखेच्या किंवा विद्याशाखेच्या अध्यापनविषयक किंवा शिक्षणविषयक पाठ्यक्रमातील किंवा कार्यक्रमातील जागांची संख्या, असा आहे ;

(ग) " समुचित प्राधिकरण " याचा अर्थ, विद्यापीठ अनुदान आयोग, भारतीय वकील परिषद, भारतीय वैद्यक परिषद, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद किंवा कोणत्याही केंद्रीय शिक्षण संस्थेतील उच्च शिक्षणाचा दर्जा निश्चित करणे, त्याचे समन्वयन करणे किंवा तो राखणे यांसाठी केंद्रीय अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये स्थापन केलेले इतर कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय, असा आहे ;

(घ) " केंद्रीय शिक्षण संस्था " याचा अर्थ,—

(एक) केंद्रीय अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये स्थापन केलेले किंवा विधिसंस्थापित केलेले विद्यापीठ ;

(दोन) संसदेच्या अधिनियमाद्वारे स्थापन केलेली राष्ट्रीय महत्त्व असलेली संस्था ;

(तीन) विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६ याच्या कलम ३ अन्वये अभिमत विद्यापीठ म्हणून घोषित केलेली आणि केंद्र सरकारकडून चालवण्यात येणारी किंवा अनुदान प्राप्त करणारी संस्था ; **१९५६ चा ३.**

(चार) केंद्र सरकारकडून चालवण्यात येणारी किंवा अनुदान प्राप्त करणारी संस्था-मग प्रत्यक्षपणे असो किंवा अप्रत्यक्षपणे असो—आणि खंड (एक) किंवा खंड (दोन) मध्ये निर्दिष्ट केलेल्या संस्थेशी संलग्न असलेली संस्था किंवा खंड (तीन) मध्ये निर्दिष्ट केलेल्या संस्थेची घटक शाखा ;

(पाच) सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० या अन्वये केंद्र सरकारद्वारे स्थापन केलेली शिक्षण संस्था, असा आहे ; **१८६० चा २१.**

(ङ) " विद्याशाखा " याचा अर्थ, केंद्रीय शिक्षण संस्थेची विद्याशाखा, असा आहे ;

(च) " अल्पसंख्याक शिक्षण संस्था " याचा अर्थ, संविधानाच्या अनुच्छेद ३० च्या खंड (१) अन्वये अल्पसंख्याक वर्गाकडून स्थापन करण्यात आलेली आणि त्यांच्याकडून प्रशासली जाणारी आणि संसदेच्या अधिनियमाद्वारे किंवा केंद्र सरकारद्वारे तसे घोषित केलेली, किंवा राष्ट्रीय अल्पसंख्याक शिक्षण

२००५ चा २. संस्था आयोग अधिनियम, २००४ या अन्वये अल्पसंख्याक शिक्षण संस्था म्हणून घोषित केलेली संस्था, असा आहे ;

(छ) " इतर मागासवर्ग " याचा अर्थ, जे सामाजिकदृष्ट्या व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले आहेत आणि ज्यांना केंद्र सरकारद्वारे तसे निश्चित करण्यात आलेले आहे, अशा नागरिकांचा वर्ग किंवा नागरिकांचे वर्ग, असा आहे ;

(ज) " अनुसूचित जाती " याचा अर्थ, संविधानाच्या अनुच्छेद ३४१ अन्वये अधिसूचित केलेल्या अनुसूचित जाती, असा आहे ;

(झ) " अनुसूचित जनजाती " याचा अर्थ, संविधानाच्या अनुच्छेद ३४२ अन्वये अधिसूचित केलेल्या अनुसूचित जनजाती, असा आहे ;

[१][(झ क) विनिर्दिष्ट उत्तर-पूर्व प्रदेश याचा अर्थ, अरूणाचल प्रदेश, मणीपूर, मेघालय, मिझोरम, नागालँड, सिक्किम, त्रिपुरा या राज्यांचे समाविष्ट असणारे क्षेत्र आणि संविधानाच्या सहाव्या अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेली आसामची जनजाति-क्षेत्रे, असा आहे ;

(झ ख) केंद्रीय शिक्षण संस्थांच्या संबंधात, राज्याच्या जागा याचा अर्थ, प्रत्येक अध्ययन शाखेतील किंवा विद्याशाखेतील एकूण वार्षिक मंजूर संख्येपैकी, ज्या राज्यात अशी संस्था असेल त्या राज्याच्या पात्र विद्यार्थ्यांमधून भरण्याकरिता राखून ठेवलेल्या आहेत अशा जागा, कोणत्याही असल्यास, असा आहे ;]

(ञ) " कोणत्याही अध्ययन शाखेतील अध्यापन किंवा शिक्षण " याचा अर्थ, पदवी (स्नातक), पदव्युत्तर (स्नातकोत्तर) व विद्यावाचस्पती (डॉक्टरेट) या मुख्य तीन स्तरांवरील अर्हतांसाठीच्या अध्ययनशाखेतील अध्यापन किंवा शिक्षण, असा आहे.

**केंद्रीय शिक्षण संस्थेतील जागांचे आरक्षण.**

**३.** केंद्रीय शिक्षण संस्थेमधील प्रवेशाबाबत जागांचे आरक्षण व त्यांची मर्यादा यांची पुढील रीतीने तरतूद करण्यात येईल :—

(एक) प्रत्येक अध्ययनशाखेतील किंवा विद्याशाखेतील एकूण वार्षिक अनुज्ञेय विद्यार्थी संख्येपैकी पंधरा टक्के जागा, अनुसूचित जातींकरिता आरक्षित असतील ;

(दोन) प्रत्येक अध्ययनशाखेतील किंवा विद्याशाखेतील एकूण वार्षिक अनुज्ञेय विद्यार्थी संख्येपैकी साडेसात टक्के जागा, अनुसूचित जनजातींकरिता आरक्षित असतील ;

(तीन) प्रत्येक अध्ययनशाखेतील किंवा विद्याशाखेतील एकूण वार्षिक अनुज्ञेय विद्यार्थी संख्येपैकी सत्तावीस टक्के जागा, इतर मागासवर्गाकरिता आरक्षित असतील.

[२][परंतु असे की, संविधानाच्या सहाव्या अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेल्या जनजाति क्षेत्रातील केंद्रीय शिक्षण संस्थेमधील राज्याच्या जागा, कोणत्याही असल्यास, त्या, जेथे अशी संस्था आहे अशा राज्य शासनाने, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट केलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती व इतर मागासवर्ग यांच्याकरिता अशा आरक्षण धोरणानुसार प्रशासित करण्यात येतील :

परंतु आणखी असे की, केंद्रीय शिक्षण संस्थेमध्ये राज्याच्या कोणत्याही जागा नसतील आणि अनुसूचित जातीकरिता राखीव असलेल्या जागा खंड (एक) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या प्रमाणापेक्षा अधिक असतील किंवा अनुसूचित जनजातींकरिता राखीव असलेल्या जागा

---

[१] सन २०१२ चा अधिनियम क्रमांक ३१, कलम २ द्वारे समाविष्ट केले.

[२] वरील अधिनियमाच्या, कलम ३ द्वारे समाविष्ट केले.

खंड (दोन) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या प्रमाणापेक्षा अधिक असतील किंवा अनुसूचित जाती व अनुसूचित जनजातींकरिता असलेल्या राखीव जागा एकत्रित धरल्या तरी, खंड (एक) आणि (दोन) अन्वये विनिर्दिष्ट केलेलल्या प्रमाणाच्या बेरजेपेक्षा अधिक असतील, परंतु, अशा जागा (क) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वीच्या दिनांकास, वार्षिक मंजूर संख्येच्या पन्नास टक्क्यांहून कमी असल्यास, खंड (तीन) अन्वये इतर मागासवर्गासाठी राखीव असण्यासाठी आवश्यक असलेल्या जागांचे प्रमाण हे, खंड (एक) आणि (दोन) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या अशा बेरजेच्या प्रमाणात, वार्षिक मंजूर संख्येच्या पन्नास टक्क्यांपेक्षा ज्या मर्यादेपर्यंत कमी पडत असेल त्या मर्यादेपर्यंत, निर्बंधित करण्यात येईल ; (ख) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वीच्या दिनांकास, वार्षिक मंजूर संख्येच्या पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक असल्यास, त्या प्रमाणात, खंड (तीन) अन्वये इतर मागासवर्गासाठी कोणतीही जागा राखीव असणार नाही ; परंतु, अनुसूचित जाती व अनुसूचित जनजातीकरिता राखीव असलेल्या जागांची मर्यादा, विनिर्दिष्ट उत्तर-पूर्व प्रदेशामधील केंद्रीय शिक्षण संस्थांच्या बाबतीत कमी करण्यात येणार नाही.]

**अधिनियम विवक्षित प्रकरणात लागू नसणे.**

**४.** या अधिनियमाच्या कलम ३ च्या तरतुदी पुढील संस्थांना लागू नसतील :—

[१][* * * *]

(ख) या अधिनियमाच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्वोत्कृष्ट संस्था, संशोधन संस्था, राष्ट्रीय व धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या संस्था :

परंतु असे की, केंद्र सरकारला जेव्हा केव्हा आवश्यक वाटेल तेव्हा, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे त्या अनुसूचित सुधारणा करता येईल ;

(ग) या अधिनियमात व्याख्या केलेली अल्पसंख्याक शिक्षण संस्था ;

(घ) केंद्र सरकार समुचित प्राधिकरणाशी विचारविनिमय करून विनिर्दिष्ट करील अशा, कोणत्याही अध्ययनशाखेतील किंवा विद्याशाखेतील डॉक्टरेट नंतरच्या स्तरावरील पाठ्यक्रमांसह उच्च स्तरीय विशेषज्ञता पाठ्यक्रम किंवा अध्ययनक्रम.

**जागा वाढविणे अनिवार्य असणे.**

**५.** (१) कलम ३ च्या खंड (तीन) मध्ये आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी, प्रत्येक केंद्रीय शिक्षण संस्था, समुचित प्राधिकरणाच्या पूर्वमान्यतेने, आपल्या वार्षिक अनुज्ञेय विद्यार्थी संख्येव्यतिरिक्त, अध्ययनशाखेतील किंवा विद्याशाखेतील जागांच्या संख्येत आणखी अशी वाढ करील, जेणेकरून, अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती व इतर मागासवर्ग यांतील व्यक्तींसाठी आरक्षित असलेल्या जागांची संख्या वगळता, त्यातील इतर जागांची संख्या, हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या शैक्षणिक सत्रासाठी [२][उपलब्ध असलेल्या अशा जागांची संख्या किंवा प्रत्यक्षात भरलेल्या जागांची संख्या यापेक्षा जी कमी असेल, त्याहून कमी नसेल.]

(२) कोणत्याही केंद्रीय शिक्षण संस्थेच्या निवेदनावरून, केंद्र सरकारची, समुचित प्राधिकरणाशी विचारविनिमय करून ज्याबाबतीत अशी खात्री पटली असेल की, आर्थिक, भौतिक किंवा शैक्षणिक मर्यादांच्या कारणास्तव अथवा शिक्षणाचा दर्जा राखता यावा म्हणून, या अधिनियमाच्या प्रारंभानंतरच्या शैक्षणिक सत्रासाठी अशा संस्थेच्या कोणत्याही अध्ययनशाखेतील किंवा विद्याशाखेतील वार्षिक अनुज्ञेय विद्यार्थी जागांची संख्या वाढवून देणे शक्य होणार नाही त्याबाबतीत, केंद्र सरकारला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रारंभानंतरच्या शैक्षणिक सत्रापासून, जास्तीतजास्त [३][सहा वर्षांच्या] कालावधीत, वार्षिक अनुज्ञेय विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी अशा संस्थांना परवानगी देता येईल आणि त्यानंतर कलम ३ च्या खंड (तीन) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, इतर मागासवर्गासाठी त्या शैक्षणिक सत्राकरिता असलेले आरक्षण अशा रीतीने मर्यादित करण्यात येईल. जेणेकरून,

---

[१] सन २०१२ चा अधिनियम क्रमांक ३१, कलम ४ द्वारे गाळले.

[२] वरील अधिनियमाच्या, कलम ५ (क) द्वारे दाखल केला.

[३] वरील अधिनियमाच्या, कलम ५ (ख) द्वारे दाखल केला.

प्रत्येक शैक्षणिक सत्राकरिता इतर मागासवर्गांसाठी उपलब्ध असलेल्या जागांची संख्या ही, प्रत्येक वर्षाच्या अनुज्ञेय विद्यार्थी संख्येतील वाढीशी अनुरूप असेल.

**२००७ या कॅलेंडर वर्षामध्ये प्रवेशांबाबत आरक्षण सुरू होणे.**

**६.** केंद्रीय शैक्षणिक संस्था, [१][२००८] या कॅलेंडर वर्षी व तेव्हापासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक सत्रातील प्रवेशांबाबत जागांच्या आरक्षणाच्या प्रयोजनार्थ, या अधिनियमाची कलमे, ३, ४ व ५ यांच्या तरतुदी अंमलात आणताना, आवश्यक असतील अशा सर्व उपाययोजना करील.

**संसदेसमोर अधिसूचना मांडणे.**

**७.** या अधिनियमान्वये काढण्यात आलेली प्रत्येक अधिसूचना, ती काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना, ठेवण्यात येईल आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी, जर त्या अधिसूचनेत कोणतेही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले, किंवा ती अधिसूचना काढण्यात येऊ नये, याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर ती अधिसूचना अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही, तथापि, अशा फेरबदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे त्या अधिसूचनेअन्वये पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

---

[१] सन २००२ चा अधिनियम क्रमांक ३१ कलम ६ द्वारे दाखल केला.

## अनुसूची

**[कलम ४ (ख) पहा]**

| अ.क्र. (१) | सर्वोत्कृष्ट संस्था, इत्यादींची नावे (२) |
|---|---|
| १ | होमी भाभा राष्ट्रीय संस्था, मुंबई व तिच्या घटक शाखा म्हणजे :— |
| | (एक) भाभा अणुसंशोधन केंद्र, तुर्भे, |
| | (दोन) इंदिरा गांधी अणुसंशोधन केंद्र, कल्पक्कम, |
| | (तीन) राजा रामण्णा प्रगत तंत्रज्ञान केंद्र, इंदूर, |
| | (चार) प्लाझ्मा संशोधन संस्था, गांधीनगर, |
| | (पाच) व्हेरिएबल एनर्जी सायक्लोट्रोन सेंटर, कोलकाता, |
| | (सहा) साहा इन्स्टिट्यूट ऑफ न्युक्लिअर फिजिक्स, कोलकाता, |
| | (सात) इन्स्टिट्यूट ऑफ फिजिक्स, भुवनेश्वर, |
| | (आठ) इन्स्टिट्यूट ऑफ मॅथेमॅटिकल सायन्स, चेन्नई, |
| | (नऊ) हरिश्चंद्र संशोधन संस्था, अलाहाबाद, |
| | (दहा) टाटा मेमारियल सेंटर, मुंबई. |
| २ | टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च, मुंबई. |
| ३ | नार्थ-इस्टर्न इंदिरा गांधी रिजनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ अँड मेडिकल सायन्स, शिलाँग. |
| ४ | राष्ट्रीय मस्तिष्क संशोधन केंद्र, मानेसर, गुडगाव. |
| ५ | जवाहरलाल नेहरू सेंटर फॉर ॲडव्हान्स सायंटिफिक रिसर्च, बेंगळूरू. |
| ६ | फिजिकल रिसर्च लॅबोरेटरी, अहमदाबाद. |
| ७ | स्पेस फिजिक्स लॅबोरेटरी, तिरूवनंतपूरम. |
| ८ | भारतीय दूर संवेदन संस्था, देहरादून. |

## The Central Educational institutions (Reservation in Admission) Act, 2006

## केंद्रीय शिक्षण संस्था (प्रवेशाबाबत आरक्षण) अधिनियम, २००६

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| an Institution of National Importance | राष्ट्रीय महत्त्वाची संस्था | [ sec. 2 (d) (ii)] |
| branch of Study | अभ्यास शाखा | [ sec. 2 (a) ] |
| constituent Unit | घटक शाखा | [ sec. 2 (d) (iv)] |
| extent of Reservation | आरक्षणाची मर्यादा | [ sec. 5 (2)] |
| Faculty | विद्याशाखा | [ sec. 2 (a), 2 (e)] |
| high Levels of Specialisation | उच्चस्तरीय विशेषज्ञता | [ sec. 4 (d)] |
| mandatory Increase of Seat | जागा वाढविणे अनिवार्य असणे | [ sec. 5 Marginal Note] |
| physical or Academic Limitations | भौतिक व शैक्षणिक मर्यादा | [ sec. 5 (2)] |
| post-Doctoral | पदव्युत्तर-डॉक्टरेट | [ sec. 4] |
| programme | कार्यक्रम | [ sec. 2 (b)] |
| reservation of Seats | जागांचे आरक्षण | [ sec. 3, 6] |
| teaching or Instruction | अध्यापन किंवा शिक्षण | [ sec. 2 (b)] |

# केंद्रीय शिक्षण संस्था (प्रवेशाबाबत आरक्षण) अधिनियम, २००६

## The Central Education Institutions (Reservation in Admission) Act, 2006

### मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अध्यापन किंवा शिक्षण | teaching or Instruction | [ कलम २ (ख)] |
| अभ्यास शाखा | branch of Study | [ कलम २ (क)] |
| आरक्षणाची मर्यादा | extent of Reservation | [ कलम ५(२)] |
| उच्चस्तरीय विशेषज्ञता | high Levels of Specialisation | [ कलम ४ (घ)] |
| कार्यक्रम | programme | [ कलम २ (ख)] |
| घटक शाखा | constituent Unit | [ कलम २ (घ) (चार)] |
| जागांचे वाटप | reservation of Seats | [ कलम ३, ६] |
| जागा वाढविणे अनिवार्य असणे | mandatory Increase of Seat | [ कलम ५, समास टीप] |
| पदव्युत्तर-डॉक्टरेट | post-Doctoral | [ कलम ४] |
| भौतिक व शैक्षणिक मर्यादा | physical or Academic Limitations | [ कलम ५ (२)] |
| राष्ट्रीय महत्त्वाची संस्था | an Institution of National Importance | [ कलम २ (घ) (दोन)] |
| विद्याशाखा | faculty | [ कलम २ (क), २ (ङ)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई